# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या
पोटकलम (२) अन्वे दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ.

## परिक्षा व मुल्यमापण मंडळ विभाग

कॉम्पलेक्स परिसर,एम.आय.डी.सी. रोड,
गडचिरोली–४४२६०५

दूरध्वनी क्रमांक:कार्यालय: ०७१३२–२२३३२०
ईमेल : coegondwana@gmail.com

जा. क्र. गों.वि./परिक्षा वि./3560/२०१७

दिनांक: १८/११/२०१७

## अधिसुचना

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयीन प्राचार्य/प्राध्यापक/कर्मचारी/महाविद्यालयीन विद्यार्थी/परीक्षार्थी तथा सबंधितांना सुचित करण्यात येते की, हिवाळी २०१७ च्या परीक्षांचे निकाल घोषित करण्याची कार्यवाही सुरू आहे. हिवाळी परीक्षा २०१७ च्या निकालामध्ये काही अडचणी/त्रूटया असल्यास त्याबाबात निकाल घोषित झाल्यानंतर त्वरीत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी. त्यानंतर येणाऱ्या अर्जावर कार्यवाही घेण्यास विलंब झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयीन प्रशासन/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची/परीक्षार्थी/सबंधितांची राहिल, यांची सर्वसबंधितांनी नोंद घ्यावी.

१. W/O, W/E, W/T आणि WLS मध्ये असलेले निकाल त्वरीत निकाल घोषित झालेल्या दिनांकापासुन ७ दिवसाच्या आत Clear करून घ्यावे. त्यानंतर आलेल्या अर्जावर विद्यापीठाकडून कार्यवाही घेण्यास विलंब झाल्यास किंवा कार्यवाही न झाल्यास त्याला महाविद्यालयीन प्रशासन/महाविद्यालयीन विद्यार्थी तथा परीक्षार्थी जबाबदार राहतील.

२. राखुन ठेवलेले निकाल ७ दिवसाच्या आत Clear न केल्यामुळे पुनर्मुल्याकंनाकरीता आवेदनपत्र/अर्ज भरण्याकरीता विलंब झाल्यास मुदत वाढवून देण्यात येणार नाही. (निर्देश क्र. १५२/२०१२ नुसार)

३. अंतर्गत मुल्याकंनाच्या (CA) गुणात निकाल घोषित झाल्यानंतर कोणताही बदल करता येणार नाही, यांची सर्वसबंधितांनी नोंद घ्यावी व तसे पत्रव्यवहार करू नये.

४. पदव्युत्तर अभ्यासक्रमाची Credit Grade System नुसार प्रथम व व्दितीय सत्राची परीक्षा देवुन तृतीय सत्राला Choice Base Credit System अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे निकाल हे Credit Grade System पध्दतीनुसारच घोषित करण्यात येत आहे. करीता महाविद्यालयीन प्रशासनाने अशा विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका व्यवस्थित तपासुन/पडताळणी करूनच विद्यार्थ्यांना वितरीत कराव्या. तसेच अशा विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकामध्ये काही चुका/त्रूटया आढळल्यास अशा गुणपत्रिका विद्यार्थ्यांना वितरीत करू नये. सदर गुणपत्रिका विद्यापीठामध्ये जमा करून नविन सुधारित गुणपत्रिका तयार करून घ्याव्या. करीता सर्वसबंधितांनी नोंद घ्यावी.

५. रा. तु. म. नागपूर विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी निर्देश क्रमांक १५७ नुसार गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात प्रवेश घेतलेला असल्यास अशा विद्यार्थ्याचे मुळ दस्ताऐवज (गुणपत्रिका, टी. आर. ची प्रत, पात्रता प्रमाणपत्र आणि स्थलातंरण प्रमाणपत्र) ७ दिवसाच्या आत सादर करणे अनिवार्य आहे.

६. निकालासबंधित कोणत्याही अडचणी/त्रूटी असल्यास महाविद्यालयाने संचालक, परीक्षा व मुल्यमापण मंडळ यांना निकाल घोषित झाल्यानतंर त्वरीत पत्राव्दारे कळविणे आवश्यक आहे. करीता सर्वसबंधितांनी नोंद घ्यावी.

संचालक
परीक्षा व मुल्यामापन मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली